# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४१६/२०१९

**तक्रारकर्ता श्री. दिपक केशव शेलार**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सह. प्रमुख कामगार अधिकारी (पु.उ.)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कामगार विभाग, प्रमुख कामगार अधिकारी यांचे कार्यालय,
सहावा मजला, विस्तारीत इमारत महापालिका मार्ग,मुंबई -४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख कामगार अधिकारी (प्र.)**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कामगार विभाग, प्रमुख कामगार अधिकारी यांचे कार्यालय,
सहावा मजला, विस्तारीत इमारत महापालिका मार्ग,मुंबई -४०० ००१

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ५८८/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. २१९/२०१९ या प्रकरणी दि. २२.०७.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

"जन माहिती अधिकारी यांनी एक वेळ निश्चित करुन अपिलार्थीना संबंधीत नस्तीचे निरीक्षण द्यावे व जे कागदपत्रे अपिलार्थीना हवे असेल त्याची प्रत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अंतर्गत निशुल्क पुरवावी. या आदेशासह अपील निकाली काढण्यात येत आहे."

आयोगाने दिलेल्या आदेशाप्रमाणे माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन तक्रारकर्त्यांनी दिनांक २१.०९.२०१९ रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्यांकडून दिनांक १८.१०.२०१९ रोजी अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२.११.२०१९ रोजी त्यांचा अहवाल आयोगास सादर केला आहे. तो अभिलेखावर घेण्यात आला. त्यांनी अहवालात नमूद केले आहे की, सर्व कागदपत्रे नस्तीमध्ये उपलब्ध आहेत. कोणतीही कागदपत्रे गहाळ झालेली नाहीत.

सदर तक्रारीवर आज दिनांक ०६.११.२०२४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे. सुनावणीचे वेळी तक्रारकर्ता उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे तक्रारकर्त्यांना नस्तीचे निरीक्षण दिले होते. तथापि, त्यांना असे वाटत होते की, त्यामधील काही कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. त्यांच्याकडे आत्ताही सदर नस्ती उपलब्ध आहे. अपिलार्थी त्या नस्तीचे निरीक्षण घेऊ शकतात.

..२/-

सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांना सदर नस्ती दाखविण्यात आली. त्यांनी मान्य केले की, नस्तीमध्ये सर्व कागदपत्रं उपलब्ध आहेत. नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या व त्यांना अपेक्षित असलेल्या कागदपत्रांबाबत ते जन माहिती अधिकारी यांना सांगतील. त्याप्रमाणे त्यांना कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत.

जन माहिती अधिकारी यांनी सदर नस्तीमधील जी कागदपत्रे अपिलार्थींना हवी आहेत त्याची छायांकीत प्रत तक्रारकर्त्यांनी कोणती कागदपत्रे त्यांना हवी आहेत याबाबतचा तपशील सादर केल्यानंतर १५ दिवसांचे आत नि:शुल्क उपलब्ध करुन द्यावीत.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग आदेश देत आहे:

**आदेश**

**१. जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनाप्रमाणे कार्यवाही करावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 7-11-2024

**मुंबई**
**दिनांक : ०७.११.२०२४**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**